# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.०७/०४/२०१९

## <u>दि.०६/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १२७/१९,भादविक ३०७,३२३,३२४,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | सोन्या ऊर्फ दिनानाथ गोरक्षनाथ पवार,वय-१९,रा.शास्त्रीनगर,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | ऋषीकेष जिवराज कामठे,वय-३१ वर्षे,रा.कोथरुड लोकमान्य कॉलनी,जळकी वस्ती,कोथरुड पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०४/२०१९ रोजी ११/३० वा. शास्त्रीनगर,कोथरुड पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम ऋषीकेष कामठे याने फिर्यादी सोबत डिसेंबर २०१८ मधे झालेल्या भांडणाचा व दि.०६/०४/२०१९ रोजी त्याचे घरास लागलेल्या आगीच्या कारणाचा मनात राग धरुन,फिर्यादी हे त्यांचे आई-वडीलांसह आशीष गार्डनकडुन साई सयाजी चौकाकडे शास्त्री नगर भागातुन जात असतांना,सदर इसमाने फिर्यादीस शिवीगाळ करुन,त्यांना जीवे ठार मारण्याच्या हेतुने डोक्यात व अंगावर लोखंडी रॉडने मारहाण करुन,फिर्यादीचे डोक्यास जबर दुखापत करून,त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.पाटील ९८९२७५३३७४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १२८/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५२ वर्षे,रा.उजवी भुसारी,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०४/२०१९ रोजी १८/२० वा. पटेल विहार गल्ली नं.३,कनोजिआ चौक,उजवी भुसारी कॉलनी,कोथरुड,पुणे तसेच कोमल रेसीडन्सी,उजवी भुसारी कॉलनी,कोथरुड,पुणे येथील सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ३६,०००/- रु किचे तसेच एक महिला,वय-६४ वर्षे,रा.उजवी भुसारी कॉलनी,पौंड रोड,कोथरुड,पुणे यांचेही गळयातील सोन्याचे मंगळसुत्र हे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.एम.जर्दे ९८५००७७३६० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ३७१/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५० वर्षे,रा.सुस रोड,पाषाण,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०४/२०१९ रोजी १९/३० वा.संत तुकाराम मंगल कार्यालय शेजारी,सुस रोड सार्वजनिक रस्त्यावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया फुटपाथवरुन पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र १.२५,०००/- रू किमतीचे जबर दस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. संदेश केंजळे ९०१११३९१०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १५६/१९,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,२/१७७ |
| **फिर्यादी** | अजमलखान पठाण,पो.उप.निरी. बंडगार्डन पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | शहानबाज बशीर खान,वय-४२ वर्षे,रा.सनं.५१/१,घरकुल सोसा.वडगांव-शेरी,पुणे (मयत) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०३/२०१९ रोजी २३/३० वा. खान रोडवरील बंगला नं.२४ चे समोर पुणे येथे |
| **तपशिल** | बंडगार्डन पो स्टे अ.मयत रजि.नं.४९/२०१९,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद मयत इसम शहानबाज बशीर खान,वय-४२ वर्षे,रा.सनं.५१/१,घरकुल सोसा.वडगांव-शेरी,पुणे याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात प्रवाहाचे विरूध्द दिशेने चालवुन,नमुद ठिकाणी तो स्वतः रोडवर आढळुन,डोक्यावर हेल्मेट न घातल्यामुळे त्याचे डोक्याला गंभीर दुखापत होवुन,तो स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पठाण ८४५९९९७८६३ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे २८५/१९,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२१ वर्षे,रा.सहकारनगर नं.१,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०१/२०१९ रोजी फिर्यादीचे मोबाईल नंबरवर |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक इसमाने ओ.एल.एक्स. या वेबसाईटवरती टी.व्ही.एस. अपाचे गाडी ही ५२,०००/- किरू विक्रीसाठी असल्याचे जाहीरात पाहुन,सदर साईट वरुन त्याची माहीती घेवुन,सदर मोबाईलधारकावर संपर्क करुन,सदर मोटार सायकलची किंमत ४६,०००/- रूपये व कुरीयरची ६,०००/- फि रूपये असे एकूण ५२,०००/- रुपये ठरवुन फोन पे अकाउंट नंबरवर भरण्यास लावुन,सदर मोटार सायकल कुरीयरने पाठवितो असे सांगुन, फिर्यादी यांचेकडून ५२,०००/- रूपये घेवून,मोटार सायकल कुरीयर मोबाईलधारक यांचेकडे पाठविली असून,त्याचेशी संपर्क करुन गाडीबाबत विचारणा करण्यास सांगितले. यावरून फिर्यादी यांनी सदर मोबाईलवर संपर्क करुन चौकशी केली असता,त्याने मोटार सायकल आणुन देतो असे सांगितले. परंतु त्यांना गाडी न देता,फिर्यादी यांची एकुण ५२,०००/-रुपयेची आर्थीक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पाटील ७५१७४८२८२८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ९२/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२८ वर्षे,रा.कर्वे रोड,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक इसमाने फिर्यादी यांच्या मोबाईल फोन करून तो अ‍ॅमेझॉन कंपनीतून बोलत आहे असे भासवुन,फिर्यादी यांना ऑफर लागल्याचे सांगून,त्यांना डेल कंपनीचा लॅपटॉप देण्याचे बहाण्याने वेग-वेगळी कारणे सांगून,फिर्यादी यांचेकडून एकूण ४१,९९८/- रूपये सदर इसमाचे पेटीएम बँके मध्ये ट्रान्सफर करावयास सांगून,फिर्यादीस कोणतेही गिफ्ट न देता, त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, उमेश माळी ८९९९२०६२६३ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३१८/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२५ वर्षे,रा.भाग्योदयनगर कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे नोव्हेंबर २०१८ चा पहिला आठवडा ते दि.२०/११/२०१८ रोजीपर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |

**तपशिल** अज्ञात मोबाईलधारक इसमाने OLX या ॲपवर त्याचा नामांकीत कंपनीचा लॅपटॉप विकण्यासाठी जाहीरात दिली असता,मोबाईलवरील धारकाने फिर्यादी यांचेशी व्हॉट्सअपद्वारे संपर्क साधुन,लॅपटॉप ३५,०००/- रुपयां मध्ये विकत घेत असल्याचा विश्वास संपादन करुन,त्यांना शिपींग चार्जेस म्हणुन ७,०००/- रुपये फिर्यादी यांचे बँकचे खात्यावर NEFT द्वारे ट्रान्सफर करण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांची ७,०००/- रुपयेची आर्थिक फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) महादेव कुंभार ८१०८००५५३७

८

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ३१९/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक पुरूष,वय-२१,रा.यवलेवाडी कोढवां-बुद्रुक,पुणे

**आरोपी** अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२४/१०/२०१८ रोजी पासुन दि.१५/११/२०१८ रोजीपर्यंत फोनव्दारे रहाते ठिकाणी ऑन लाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा भाऊ यांनी वेबसाईटवर नोकरी करीता रजिस्टर अर्ज केल्याने,सदर वेबसाईटवर सिमकार्ड धारक मोबाईलधारक यांनी फिर्यादी यांचे भावास नोकरी लावण्या करीता,त्यास ऑनलाईन टेस्ट फि,ट्रेनिंग सिक्युरीटी,मेडीकल अपार्टमेंट सिक्युरीटी,बाँड सिक्युरीटी,प्रोसेसींग फि,आयडी क्रिऐट,अपॉईन्टमेंट,बार कोड आयडीचा पासवर्ड ओपन करण्याकरीता व बार कोड आयडी जनरेट करण्याकरीता अशा वेग-वेगळया कारणाकरीता वेळोवेळी रक्कम मागुन,सदर बँकाचे विविध खात्याचे क्रमांकावर एकुण ३,४६,०७८/- रूपये इतकी ऑनलाईन रक्कम त्यांचे ई-मेल आयडीव्दारे व फोनव्दारे भरण्यास सांगुन,फिर्यादी यांचे भावास नोकरी न लावता,त्यांनी भरलेली रक्कम त्यांना परत न देता, भरलेली रक्कम पाहीजे असेल तर आणखीन रक्कम भरावी लागेल असे सांगुन,फिर्यादी यांची एकुण ३,४६,०७८/- रूपयेची फसवुणक केली आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी. अनिल पाटील ९९२३१८६९९९

९

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ३६८/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** अनमोल झाडे,वय-४३ वर्ष,रा.नाना पेठ,पुणे

**आरोपी** अनोळखी दोन महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०५/०४/२०१९ रोजी १९/४५ वा. अहुरा वाईन शॉप समोर पर्णकुटी चौक,येरवडा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे राहते घराचे काम चालु असल्याने,त्यासाठी त्यांनीफायनान्स व बँकेतुन २,५०,०००/- रोख रक्कम रूपये काढुन ते भावाला देण्यासाठी जात असताना,नमुद ठिकाणी त्यांचे मित्राला भेटून घरी जाण्यासाठी थांबले असताना,नमुद दोन अनोळखी महिला यांनी फिर्यादीस कपडे दाखवुन व कपडे खरेदी करायचे का असे सांगुन,त्यांना बोलण्यात गुंतवून दुस-या महिलेने फिर्यादी यांची नजर चुकवुन,फिर्यादी यांची २,५०,०००/- रुपये रक्कम असलेली असलेली पैशाची बॅग चोरून नेली आहे.

**त.अंमलदार** पो.हवा. जाधव ९९२३२०६७९०

## <u>दि.०७/०४/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे ३१३/१९,भादविक ३०२,५०४

**फिर्यादी** विशाल डोके,वय-३४,रा.वडाची वाडी,उंड्री,पुणे

**आरोपी** राहुल परशुराम बारवकरक,वय-३२,रा.माळवाडी,हडपसर,पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०४/२०१९ रोजी २०/०० वा. युडी देशी दारूचे सरकारमान्य दुकाना समोर मगरपट्टा हडपसर,पुणे येथे असलेल्या कट्टयावर

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील वसंत डोके हे नमुद ठिकाणी कट्टयावर झोपलेले असताना, यातील नमुद इसमाने वसंत डोके यांना झोपेतुन उठविले असतना,त्यांनी त्यास हात उगारल्याचे कारणावरून,सदर इसमाने त्याचा राग मनात धरून,वसंत डोके यांना हाताने मारहाण करून,जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांना जोरात धक्का देवुन,अडीच ते तीन फुटाचे कट्टयावरून खाली पाडुन,त्यांना जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.डी.पाटील |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**